दैनिक
# श्रमिक लोकराज्य

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष 7 । अंक 23 । गुरुवार, दि. 10 सप्टेंबर 2026 । RNI MAHMAR/2021/85782 । पाने 4 । किंमत 2 रूपये । ई-पेपर : www.shramiklokrajya.in


## थोडक्यात

### नांदेड : मराठवाड्याच्या विकासासाठी शेतकरी पुत्रांचे लाक्षणिक उपोषण

**नांदेड :** मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष, दुष्काळाची स्थिती, शेतकरी समस्या आणि पायाभूत सुविधांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अर्धापूर तालुक्यातील देळुब येथे दोन युवकांनी बुधवारी लाक्षणिक उपोषण केले. संदीपकुमार देशमुख आणि बालाजी हेंद्रे पाटील यांनी शेताच्या बांधावर उपोषण करत मराठवाड्याच्या विकासासाठी ठोस कृती आराखडा जाहीर करण्याची मागणी केली.

### मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारमधील काही नेत्यांवर गंभीर आरोप करत आंदोलनाबाबत षडयंत्र रचले जात असल्याचा दावा केला. दुसरीकडे सरकारकडून मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

### पावसाची अनिश्चितता; पाणीटंचाईवर प्रशासनाची नजर

लातूर : जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात पावसाचे वितरण असमान राहिल्याने प्रशासनाने पाणीटंचाईच्या संभाव्य परिस्थितीवर लक्ष केंद्रित केले आहे. पाझर तलाव, बंधारे आणि उपलब्ध जलसाठ्यांची नियमित पाहणी करण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील काही भागांत पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे.

### कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरांचे आयोजन

बीड : मराठा आरक्षणाशी संबंधित कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बीड जिल्ह्यात विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशासनाकडून ११, १५ आणि १६ सप्टेंबर रोजी विविध ठिकाणी शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रे, नोंदी आणि प्रमाणपत्र प्रक्रियेबाबत मार्गदर्शन मिळावे हा या शिबिरांचा उद्देश आहे.

### दुष्काळी परिस्थितीचा प्रशासनाकडून आढावा

धाराशिव : यंदाचा पावसाळा जिल्ह्यासाठी आव्हानात्मक ठरत असल्याने पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चारा यांचे नियोजन करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. जिल्ह्यातील पावसाची स्थिती आणि उपलब्ध जलसाठ्यांचा आढावा घेण्यात आला. पावसातील खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम होण्याची शक्यता असून ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचे नियोजन महत्त्वाचे ठरत आहे.

### पुढील दोन दिवस पावसाची शक्यता; नांदेड-हिंगोलीला यलो अलर्ट

मराठवाडा : मागील काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये पिकांची स्थिती चिंताजनक झाली आहे. मात्र पुढील दोन ते तीन दिवसांत राज्याच्या अनेक भागांत वादळी पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. नांदेड आणि हिंगोलीसह काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यातील काही भागांत हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे.

# आभाळाकडे डोळे, शेतात करपती पिके
# चिंतेत शेतकऱ्यांचा पोळा

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**जाहूर :** शेतकऱ्यांचा सर्वात जिव्हाळ्याचा सण म्हणून ओळखला जाणारा बैल पोळा आज उत्साहात साजरा होत असला, तरी यंदा शेतकऱ्यांच्या आनंदावर दुष्काळाचे सावट आहे.पावसाने विस दिवसांपेक्षा मोठी उघडीप दिल्याने सोयाबीन,तूर,कापूस यासह खरीप पिके पाण्याअभावी वाळू लागली असून, अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे.



त्यामुळे शेतकऱ्यांचे मन शेतात लागत नसल्याचे चित्र मुखेड तालुक्यातील जाहूर,उंद्री (प.दे),राजुरा बु,अंबुलगा बु,बिल्लाळी,भाटापूर (प. दे),चोंडी,औराळ,लोणाळ,लिंगापूर, तुपदाळ बु,खु,धनज,ठाणा,हसनाळ (प.दे),मेथी,येवती,राजुरा खु,राजुरा तांडा,सांगवी (भा),पाळा,मंडलापूर सह परिसरातील गावांमध्ये पाहायला मिळत आहे.

वर्षभर शेतकामात साथ देणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून बैल पोळ्याला विशेष महत्त्व आहे.या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना आंघोळ घालून त्यांची रंगरंगोटी करतात. शिंगांना रंग,अंगावर झुली, गोंडे, घुंगरू, माळा आदींनी सजवून बैलांची पूजा केली जाते.

**मात्र यंदा पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर खरीप हंगामाचे मोठे संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी पिके माना टाकत असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकीकडे डोळ्यासमोर करपणारी पिके आणि दुसरीकडे सर्जा-राजाच्या सणाचा उत्साह, अशा दुहेरी भावनेत शेतकरी पोळ्याची तयारी करत आहे. पाऊस नाही म्हणून पिकं वाळत आहेत, दुष्काळाचं सावट गडद होत आहे; तरीही शेतकरी आपल्या सर्जा-राजाचा सण श्रद्धा आणि परंपरेने साजरा करत आहे.**

## धर्माबाद तालुका दुष्काळाच्या उंबरठ्यावर.!
# धर्माबाद काँग्रेस पक्ष आक्रमक; तात्काळ उपाययोजना करा..

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**धर्माबाद :** धर्माबाद तालुक्यात पावसाने मोठी दडी मारल्याने दुष्काळाची गडद् छाया पसरली असताना आता काँग्रेस तालुकाच्या वतीने आक्रमक पवित्रा घेत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. यावर्षी खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला असून शेतातील सोयाबीन, तूर, उडीद या पिकांनी माना टाकल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर धर्माबाद तालुका काँग्रेस च्या वतीने शासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनातील प्रमुख मागण्या १) धर्माबाद तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावा. २) गावोगावी पिण्याच्या पाण्यासाठी पाणी आरक्षित करावे व टँकरद्वारे पुरवठा सुरू करावा.
३) जनावरांसाठी तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात. ४) नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.तालुक्यातील परिस्थिती अत्यंत गंभीर असून शासनाने तात्काळ दखल न घेतल्यास धर्माबाद तालुका काँग्रेस च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी आणि गावकरी दोघेही संकटात आहेत.पाणी नाही, चारा नाही.शासनाने तात्काळ दुष्काळ जाहीर करावे म्हणून निवेदन देण्यात आले.



**यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष व्यंकटराव दत्तराम पाटील,गोविंद पाटील रोशनगावकर,निलेश पाटील बाळापूरकर, सूर्यकांत पाटील जूनीकर, डॉ.दत्ताहारी शिंदे, विठ्ठल राव कुंडलवाडे, हनुमंत पाटील नरवाडे, बालाजी पाटील शिंदे, अवधूत पाटील सालेगावकर, फुलाजी पाटील नागनाथ जिंकले बालाजी जारीकोटे, म.मुबाशिर,विठ्ठल पाटील रोकड गटोड माजीत पटेल, अफसर बेग,शेख अरशद, पंढरीनाथ खांडरे, इमरान अली,बबलू असताने,जावेद भाई फुलवाले, असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.**

# कायद्याचे पालन करून सण-उत्सव साजरे करा
## उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** कायद्याचे पालन करत सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित ठेवून सण-उत्सव साजरे करावेत, असे आवाहन देगलूर उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांनी केले. मुखेड तहसील कार्यालयात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट होते. प्रमुख उपस्थितीत तहसीलदार अभयराज नंजुडे, मुख्याधिकारी किरण डाके,पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता महेश गट्टुवार, माजी नगराध्यक्ष बाबुराव देबडवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी आदमपुरकर, पोलीस उपनिरीक्षक गणेश माने, पोलीस उपनिरीक्षक अभिजित तुतरवाड , डीएसबी चे पांडुरंग पाळेकर, तसेच पोलीस पाटील संघाचे जिल्हा उपाध्यक्ष माधव टाकळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पोपळघट म्हणाले की, सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणणारे माध्यम आहेत. त्यामुळे कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची काळजी घेत उत्सव साजरे करावेत. कायदा व सुव्यवस्था राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, नागरिकांनी प्रशासन व पोलिसांना सहकार्य करावे.

उपविभागीय पोलीस कार्यालयाच्या वतीने उत्कृष्ट गणेशोत्सव देखाव्यांना पारितोषिक देण्यात येणार असून, मुखेड तालुका मराठी पत्रकार संघ व मुखेड पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमानेही उत्कृष्ट देखाव्यांचा गौरव केला जाणार असल्याचे पोपळघट यांनी स्पष्ट केले.



**बैठकीस विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, महिला, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासन आणि पोलिसांनी नागरिकांच्या सूचनांची दखल घेत सण-उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार यशवंत बोडके यांनी केले.**

**शांतता समितीच्या बैठकीत उपस्थित नागरिकांनी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विविध समस्या व सूचना प्रशासनासमोर मांडल्या. मोती नदी परिसरातील सुविधा वाढविणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे, शहरातील विविध ठिकाणी खोदलेले रस्ते व्यवस्थित करणे, पाण्याची व्यवस्था करणे, छोटे तलाव तयार करणे तसेच वीज विभागाशी संबंधित अडचणी दूर करणे, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा व्यवस्थित करणे आणि उत्सव काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवणे, अशा मागण्या नागरिकांनी केल्या.**

# अवैध देशी दारू वाहतुकीवर सिंदखेड पोलिसांची कारवाई
# 1.02 लाखांचा मुद्देमाल जप्त

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**माहूर :** नांदेड जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत सिंदखेड पोलिसांनी अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत देशी दारू व वाहतुकीसाठी वापरलेली स्कुटी असा एकूण १,०२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक ०९ सप्टेंबर २०२६ रोजी सिंदखेड पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गोपनीय माहिती मिळाली की, चिंचखेड कडून रामपूरकडे जाणारे रोडने एका स्कुटीवर अवैध देशी दारूची वाहतूक होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार मौ. रामपूर पैनगंगा नदीचे पुलाजवळ पोलीस पथकाने सापळा रचला असता स्कुटी क्रमांक MH-29-BT-3131 या स्कुटीवर दोन्ही बाजूने पांढऱ्या पोत्यात अवैधरित्या देशी दारूची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.




पोलिसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये देशी दारूच्या १,००० बाटल्या, एकूण किंमत ४०,००० रुपये* आणि दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्कुटी, अंदाजे किंमत ६२,००० रुपये असा एकूण १,०२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात आरोपी नामे करण प्रल्हाद बोटरे, वय २२ वर्षे, दुर्गेश विजय दुतकर, वय २१ वर्षे, दोघे रा. नविन कापेश्वर, ता. आर्णी, जि. यवतमाळ यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना देशी दारूची वाहतूक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सिंदखेड येथे गु.र.नं. १०९/२०२६ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग माहूर किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जोधळे, पोलीस अंमलदार पोना/ कोंडापलकुलवार, पोकॉ/इंगळे, चालक होमगार्ड राठोड (सर्व नेमणूक सिंदखेड पोलीस ठाणे) यांनी पार पाडली असल्याचे जनसंपर्क अधिकारी आशिष सिताराम बोराटे, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या प्रेस नोटमध्ये कळविले आहे.**

## संपादकीय

# बहुमतखोरीचा बळी



जे झाले ते सुन्न करणारे आहे. देशाच्या राजधानी दिल्लीत गेली जवळपास दोन दशके वास्तव्यास असलेला प्रख्यात मणिपुरी गिटारवादक चोंगथम विक्रम सिंह यांस आठ-दहा जणांनी ठेचून मारले. विक्रम सिंह यांचे वय ५४. शरीरानेही तसे ते कृश. त्यांचे पाप इतकेच की मध्यरात्रीच्या सुमारास घराखाली गोंगाट करणाऱ्या रिकामटेकड्यांस ते शांत बसा असे सांगायला गेले. अलीकडे एका मोठ्या बिनडोकबहुल समाजास वाद्यांचा, फटाक्यांचा, ते काही नसेल तर गाठ्या-फाफडा खात इतरांचे डोके उठवणारा गोंगाट करणे हे पौरुषत्वाचे लक्षण वाटू लागले आहे. या अशा 'वीरपुरुषांची' संख्या भूमिती श्रेणीने वाढत असल्याने हे गोंगाट-सम्राट सगळीकडे दिसतात. अगदी विमानातही आपले डबे काढून चरत बसण्यात त्यांना काही वावगे वाटत नाही. या अशा डबे खाण्यात कोणास आक्षेप असण्याचे कारण नाही. पण पिठाच्या गिरणीप्रमाणे तोंडाची चक्की चालू ठेवत हा वर्ग जी वचवच करत असतो तीमुळे कोणाही सज्जन भारतीयाची मान लाजेने खाली जाईल. हे असे करणारे सुशिक्षित असल्याचे म्हणवतात. आर्थिकदृष्ट्याही बऱ्या घरातले असतात ते. पण डोक्यात अकलेचा ठणठणाट. विक्रम सिंह यांच्यावर हल्ला करणारे रिकामटेकडे आणि हे या दोहोंत अक्कलशून्यता हा समान धागा. त्यात विक्रम सिंह यांच्यावरील हल्लेखोरांची आर्थिक परिस्थितीही अधिक हलाखीची असणार. म्हणून त्यांच्या मनातील विखारही अधिक तीव्र. आपल्या गोंधळ घालण्यास आक्षेप घेणाऱ्या विक्रम सिंह यांचा या बेकाम आणि बेफाम तरुणांनी त्याच्या तिसऱ्या मजल्यावरील घरापर्यंत पाठलाग केला आणि लाथा-बुक्क्यांच्या वर्षावात त्याचा जीव घेतला. जगातील तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या— आणि दुसऱ्या क्रमांकावर जाण्याचे नावही न काढणाऱ्या (कारण या स्थानी चीन आहे.)— या संभाव्य महासत्तेचे नागरिक आता तरी डोळे उघडून आसपास काय सुरू आहे याची दखल घेतील काय?

अभागी विक्रम सिंह भले दूरच्या मणिपूरचे असतील आणि त्या प्रांतातील सर्वांस नेपाळी म्हणवून हिणवण्याची सोयही आपणास असेल पण त्यांच्याबाबत जे झाले ते आता तितके दूरचे राहिलेले नाही. विद्यानगरी वगैरे असलेल्या पुण्यात कोणा विद्यानंद बापट या तरुणावर ज्या कारणासाठी हल्ला होतो त्याच कारणासाठी विक्रम सिंह यांचा जीव घेतला जातो. दोन्हीही घटनांतील हल्लेखोरांची मानसिकता तीच. तिच्या प्रदर्शनाने आपण समाज म्हणून अजूनही कसे मागास आहोत हेच दिसून येते. दळणवळणाच्या कोणत्याही सोयीसुविधा विकसित झालेल्या नव्हत्या त्या काळी माणसे एकमेकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मोठमोठ्याने बोलत, आवाज करत आणि भडक रंगाचा वापर करत. पुढे उत्क्रांतीच्या वाटेवर माणसाची प्रगती झाली. ते प्रगतीचे वारे आपल्यातील काहींस वळसा घालून पुढे गेले असावेत. कारण प्रगतीच्या वाटेवर मार्गक्रमण करत असताना अंगी विकसित होणारी सभ्यता, ऋजुता, इतरांचा आदर करण्याची वृत्ती इत्यादी गुणांचा आपल्यातील अनेकांशी कित्येक पिढ्यांत संबंध आल्याचे आढळत नाही. या अशांचे सर्व काही भडक आणि बटबटीत. त्यांची संख्याही अधिक. आणि लोकशाहीत संख्या महत्त्वाची. योग्य की अयोग्य हा मुद्दाच नाही. सर्व काही बहुमत की अल्पमत यावर ठरणार. "बऱ्याचदा बहुमत म्हणजे सर्व मूर्ख एकाच बाजूस असणे", असे म्हणण्याची हिंमत दाखवणारे जॉन एफ. केनेडी आणि त्यांचा खरा लोकशाहीवाद या अशा बहुमती बलवंतांच्या आकलनापलीकडे असल्याने त्याचा दाखला देणे तसे अयोग्यच. परंतु कोणीतरी कोणाच्या तरी केवळ गोंगाट करण्यावर आक्षेप घेतो म्हणून त्याचा जीव घेतला जात असेल तर अशा समाजास काय म्हणायचे? ही इतकी असंवेदनशीलता येते कोठून? आली तरी तिला अंगी इतके कसे काय मुरू दिले जाते?

विक्रम सिंह यांच्या हत्येबाबत हा प्रश्न पडतो कारण तो ज्या प्रांतातून येतो ते राज्य आपल्या सामायिक असंवेदनशीलतेचा अनुभव सातत्याने घेत आहे. याच राज्यातील महिलांची विवस्त्र धिंड काढली गेली. तरीही आपणास त्याचे काही वाटले नाही. त्या राज्यातील कुकी आणि मैतेई समाजाच्या संघर्षात शेकडो मारले गेले. त्याही वेळी मरणारे अन्य धर्मीय आहेत यात अनेकांनी समाधान मानले. अन्यत्र अशा अशांत प्रदेशात केवळ लष्कर तैनात करण्यात येत आहे या वृत्ताने शांतता निर्माण होऊ लागते. परंतु याच मणिपुरात प्रक्षुब्ध जमावाने लष्करालाही लक्ष्य केले आणि सरकारी शस्त्रागारही लुटले. तरीही अन्यत्र कोणाची झोप उडाली नाही. या राज्यातील अशांततेचा आगडोंब शांत करण्यासाठी देशाच्या सर्वोच्च नेत्यास तेथे जाण्यास कित्येक महिने, वर्षे लागली. तरीही परिस्थिती शांत झाली नाही ती नाहीच. मुख्यमंत्र्यांविरोधात अन्य मंत्र्यांनी बंड केले, मंत्र्यांविरोधात आणखी कोणी बंडाचा झेंडा उगारला. हे असे अन्य कोणा राज्यात झाले असते तर प्रसारमाध्यमे आणि राजकारणी सर्व पैस ढवळून काढते. पण प्रश्न मणिपूरचा. ते ईशान्येकडील एक राज्य. तेथील माणसे दिसण्या- बोलण्यापासून बहुसंख्याक भारतीयांपेक्षा वेगळी. त्यामुळेही असेल; पण तेथील कोणत्याच संकटाने कोणाच्या मनावर ओरखडा उमटल्याचे जाणवले नाही. आता तर त्या राज्यातील एक अत्यंत लोकप्रिय कलावंत हकनाक मारला गेला. विक्रम सिंह याचे घराणे कलावंताचे. गाणे हे त्याच्या रक्तात. त्याची आई आज ८५ वर्षांची आहे. मणिपूरच्या लता मंगेशकर अशी त्यांची ओळख. आजही त्या शास्त्रीय संगीताच्या शिकवण्या घेतात. याच गाण्याच्या प्रेमापोटी त्यांचा मुलगा राजधानी दिल्लीत आला. सुरांवर मनापासून प्रेम करणाऱ्या या कलावंताने आसमंतात ठासून भरून राहिलेल्या बदसुरास आक्षेप घेतला आणि तो जीव गमावून बसला.

ही घटना काय, पुण्यात बापटांस झालेली मारहाण काय! हे सगळे इशारे आहेत. बहुमताच्या बदसुरांस आक्षेप घेणाऱ्या अल्पसंख्याकास दिले जाणारे. त्या मागील अर्थ एकच. आम्ही गोंगाट करणार, आम्ही बेशिस्त वागणार, आम्ही सर्व नियमभंग करणार... कारण आम्ही बहुमतात आहोत!! जे आक्षेप घेऊ इच्छितात; त्यांनी ते खुशाल घ्यावेत. त्याने काहीही फरक पडणार नाही. पोलीस त्यांच्याकडे पाहणारही नाहीत, न्यायपालिका फार फार तर त्रागा व्यक्त करेल; पण कसला ठोस आदेश देणार नाही आणि प्रशासन तर तेवढेही करणार नाही... कारण ते बहुमतास बांधील असते. तेव्हा गुमान आम्हास सामील व्हा अन्यथा कानात बोळे घालून गप्प बसा असा या सगळ्याचा अर्थ. विक्रम सिंह यांस तो आधीच लक्षात आला असता तर तो घरी येऊन, दारे-खिडक्या बंद करून गिटारच्या तारा छेडत मन रिझवता. ते त्याने केले नाही. उगाच बहुमताचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांस आव्हान देण्याचा प्रयत्न त्याने केला आणि त्या बदल्यात जीव गमावला. बहुमतखोरांच्या विरोधात जाण्याआधी आपली वयोवृद्ध आई, पत्नी आणि मुले-बाळे यांचा विचार त्याने केला असता तर कदाचित हे अगोचर कृत्य त्याने केलेही नसते. या जर-तर शब्दप्रयोगास आता काही अर्थ नाही. तो काही परत येणार नाही आणि त्याच्या गिटारच्या तारा काही परत झंकारणार नाहीत. या बहुसंख्याकवादाची नशा इतकी तीव्र की आपली प्रगती नव्हे; अधोगती सुरू आहे हेही अनेकांस लक्षात येत नाही. आपला प्रवास आधुनिकतेकडे नव्हे; तर आदिमतेकडे सुरू आहे, हेही अनेकांस जाणवत नाही.

तथापि कोणत्याही समाजाची प्रगती तेव्हा होते जेव्हा तो समाज बहुमत-अल्पमत यापेक्षा योग्य-अयोग्य अशी फारकत करू लागतो. हे व्हायला हवे. अन्यथा विक्रम सिंह यांच्यासारख्यांचे बळी जातच राहतील. ते मरण सामूहिक शहाणपणाचे असते. कोणीतरी कोणाच्या तरी केवळ गोंगाट करण्यावर आक्षेप घेतो म्हणून त्याचा जीव घेतला जात असेल तर अशा समाजास काय म्हणायचे? ही इतकी असंवेदनशीलता येते कोठून? आली तरी तिला अंगी इतके कसे काय मुरू दिले जाते?

# वानार्टीसाठी 100 कोटींचा निधी मंजूर करा – आ.डॉ.तुषार राठोड

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

● साईबाबा मंदिर प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे मुख्यमंत्री फडणवीस व महसुलमंत्री विखे यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण ● पावसाअभावी पिके करपण्याच्या स्थितीत कृषी पंपांना १२ तास वीज देण्याचीही मागणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** सारथी, महाज्योती, TRTI, बार्टी आणि आर्टीच्या धर्तीवर भटक्या व विमुक्त जाती (VJNT) तसेच विशेष मागास प्रवर्ग (SBC), विशेषतः विमुक्त जाती व भटक्या जमाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'वानार्टी' (वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था) साठी आगामी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करून संस्था पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी, अशी मागणी मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार गोविंदराव राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

पुरेशा निधीअभावी वानार्टी पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्याने या घटकातील गुणवंत विद्यार्थी व युवा वर्ग शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि शिष्यवृत्तीपासून अपेक्षित लाभापासून वंचित राहत असल्याकडे आमदार राठोड यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे.

वानार्टी संस्थेच्या माध्यमातून UPSC, MPSC, बँकिंग आणि संरक्षण क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे, परदेशी शिक्षणासाठी फेलोशिप, M.Phil./ Ph.D. विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना व विद्यावेतन लागू करावे, वानार्टीच्या प्रभावी कामकाजासाठी पूर्णवेळ संचालक, संशोधन अधिकारी आणि आवश्यक कर्मचारी वर्गाची तातडीने पदभरती करावी. तसेच राज्यातील गरजू विद्यार्थी व लाभार्थ्यांपर्यंत संस्थेच्या योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी विभागीय स्तरावर वानार्टीची उपकार्यालये सुरू करावीत, अशीही मागणी आमदार डॉ. राठोड यांनी केली आहे.



### पावसाअभावी पिके करपण्याच्या स्थितीत कृषी पंपांना १२ तास वीज द्या

**नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात मागील २५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिके करपू लागली असून, संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता कृषी पंपांना वीजपुरवठ्याचा कालावधी ८ तासांवरून १२ तास करावा, पुढील काही दिवस पाऊस पडेपर्यंत वीजपुरवठ्याचा कालावधी वाढविल्यास उपलब्ध पाण्याच्या माध्यमातून शेतकरी पिके वाचवू शकतील. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी सुद्धा आमदार डॉ. तुषार राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**



### साईबाबा मंदिर प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यास मुख्यमंत्री फडणवीस व महसुलमंत्री विखे यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण

**मुखेड तालुक्यातील वसंतनगर येथील श्री साईबाबा मंदिर देवस्थानच्या वतीने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यास २५ हजारांहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असून या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित राहावे, अशी विनंती मुखेड-कंधार मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार गोविंदराव राठोड यांनी केली आहे.**

# 33 जिल्ह्यांना मागे टाकत लातूर ठरला महाराष्ट्राचा 'बादशहा'!

## 70 व्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत लातूरचा 'गोल्डन गेम'!

## असद शेख, अकबर पठाण व नईम शेख यांची महाराष्ट्र संघात निवड

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**लातूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन व अमरावती जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे दि. 4 ते 7 सप्टेंबर 2026 दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 70व्या महाराष्ट्र स्टेट बॉल बॅडमिंटन चॅम्पियनशिप 2026-27 स्पर्धेत लातूर जिल्हा संघाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्र चॅम्पियन होण्याचा बहुमान मिळविला.

या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील तब्बल 33 जिल्ह्यांच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. लातूर जिल्हा संघाने स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच आपला दबदबा कायम ठेवत गोंदिया, अमरावती महानगर, अहिल्यानगर, सिंधुदुर्ग, धुळे, मुंबई, अकोला, ठाणे व वर्धा या संघांवर मात केली. उपांत्य फेरीत पुणे ग्रामीण संघासोबत झालेल्या अटीतटीच्या सामन्यात लातूरने 2-1 असा थरारक विजय मिळवत अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामन्यात लातूर जिल्हा संघाने पुणे महानगर संघाविरुद्ध सुरुवातीपासूनच आक्रमक व नियोजनबद्ध खेळाचे प्रदर्शन करत सरळ दोन सेटमध्ये एकतर्फी विजय मिळविला आणि दिमाखात सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

**गेम चेंजर्सच्या आक्रमक खेळीने लातूर ठरला चॅम्पियन**

लातूरच्या या ऐतिहासिक विजयात संघातील खेळाडूंच्या उत्कृष्ट समन्वयासोबतच त्यांच्या वैयक्तिक कौशल्याचीही निर्णायक भूमिका राहिली. बेस्ट शूटर अकबर पठाण, राष्ट्रीय खेळाडू नईम शेख, नेट चेकर व राष्ट्रीय खेळाडू अदनान शेख, अपकमिंग स्टार व बेस्ट फ्रंट ड्रॉपर फैजान शेख तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू व पोलीस दलात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले असद शेख यांच्या गेम चेंजिंग खेळीमुळे लातूर संघाने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजविले.

लातूर जिल्हा संघात रितेश घोटमुकले, अर्शद शेख, प्रथमेश पाटील, आमेर शेख व सईद यांचा समावेश होता. संघाला आयुब जागीरदार, विकास जायभाये, प्रशांत सुरनर व साक्षी रोकडे यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

लातूरच्या या शानदार कामगिरीनंतर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. नईम शेख (स्टार ऑफ इंडिया), अकबर पठाण (इंडिया बेस्ट प्लेअर) आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू असद शेख यांची दि. 24 ते 28 सप्टेंबर 2026 दरम्यान श्रीकालहस्ती, आंध्र प्रदेश येथे होणाऱ्या 72व्या ऑल इंडिया नॅशनल बॉल बॅडमिंटन चॅम्पियनशिप 2026-27 स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.

ही निवड राज्यसचिव अतुल इंगळे, उपाध्यक्ष ऋषिकेश पापडकर, सहसचिव विजय पळसकर, निवड समिती अध्यक्ष डॉ. हरीश काळे, निवड समिती सदस्या मनीषा खापरे व सरिता ठावकर यांनी जाहीर केली.

**लातूर जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून खेळाडूंचा सत्कार**

राज्यस्तरीय स्पर्धेतील नेत्रदीपक विजय तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल लातूर जिल्हा बॉल बॅडमिंटन संघटनेतर्फे खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. जिल्हाध्यक्ष धनंजय कोत्तावार, उपाध्यक्ष ज्ञानोबा भोसले, सहसचिव विजय जगताप, सुनील शिंदे, मेहराज सर, तबरेज शेख व मनीषा सूर्यवंशी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




**या यशस्वी वाटचालीत राम लिंबाळे, तानाजी कदम, मारुती सगरे, संगमेश्वर लाटे, गोविंद काळे, हसन शेख, पप्पू माने, मनोज दहातोंडे, सुनील शिंदे, अकबर पठाण, नईम शेख, अदनान शेख, हर्षद शेख, फैजान शेख, विकास जायभाये, प्रशांत सुरनर, अरहान शेख, अनिस पिंजारी, खब्बू शेख, किरण पौळ, अनुसया पाटील, मनीषा माने, स्वाती औसेकर, उर्मिला, स्वाती फड, कोमल पौळ, कल्पना पौळ, उज्वला कांबळे, विद्या अंभुरे, पूजा राठोड, मनीषा सूर्यवंशी, नीता बानाटे, पृथ्वी यादव, भूमीका, वैष्णवी, प्रनिता,कांचन,रोहिणी, नंदिनी, राधा,दिपाली, साक्षी रोकडे व शुभांगी जाधव यांसह अनेक खेळाडूंचे योगदान राहिले आहे. लातूरच्या बॉल बॅडमिंटनच्या या सातत्यपूर्ण यशामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात पुन्हा एकदा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राज्य विजेतेपदासह आता राष्ट्रीय स्पर्धेतही महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे लातूरचे खेळाडू देशपातळीवर आपल्या खेळाचा ठसा उमटविण्यास सज्ज झाले आहेत.**




**35 वर्षांची गौरवशाली परंपरा**

लातूर जिल्हा मागील 35 वर्षांपासून बॉल बॅडमिंटन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असून अनेक दिग्गज पदाधिकारी व खेळाडूंनी जिल्ह्याचे नाव राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. तत्कालीन जिल्हा सचिव नानासाहेब माने, अध्यक्ष अड. हेमंत पाटील, राजाभाऊ शेळके, व्यंकटराव गुणाले, कादर मामू, प्रदीप जाधव, गुलाबराव माने, शिवकुमार सोनटक्के, चांद मामू, माशाळकर साहेब, माकने सर, रवी सरदेशमुख, विजय कुंटे, राजेश सोनकांबळे, बुजारे दादा, जगरूप कराड व ॲड. जगदीश मद्रे यांसारख्या मान्यवरांचे योगदान लातूरच्या बॉल बॅडमिंटनच्या वाटचालीत मोलाचे ठरले आहे.

**असद शेख यांच्या मार्गदर्शनातून अनेक खेळाडूंचे करिअर घडले**

लातूर जिल्ह्यात बॉल बॅडमिंटनच्या प्रसार-प्रचारासाठी तसेच खेळाडूंना सातत्याने मार्गदर्शन करून त्यांना मोफत क्रीडा साहित्य व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देत अनेक खेळाडूंचे करिअर घडविण्याचे मोलाचे कार्य जिल्हा सचिव, प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय खेळाडू असद शेख यांनी केले आहे. त्यांच्या या योगदानामुळे लातूर जिल्ह्यातील अनेक गुणवान खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. सन 2008 पासून जिल्हा संघटनेचे सचिव व प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या असद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली आहे.

# ‘मुलांच्या हातात पुस्तक हवे, कामाचे साधन नाही’

## बालकामगार निर्मूलनासाठी विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

### शाळांनी २५ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांची नावे पाठवावीत-सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांचे आवाहन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** बालकामगार निर्मूलनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सहायक कामगार आयुक्त कार्यालय, नांदेड यांच्या वतीने जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, तर इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी केले आहे.




बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील महत्त्वाचे आणि आनंददायी पर्व आहे. मुलांच्या हातात कामाचे ओझे नसून पुस्तक, शिक्षण, खेळ आणि स्वप्ने असली पाहिजेत. बालकामगाराची समस्या ही केवळ एका मुलाची किंवा कुटुंबाची समस्या नसून संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी निगडित सामाजिक समस्या आहे. बालकामगार निर्मूलनासाठी शासनामार्फत विविध कायदे, योजना आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. या प्रयत्नांना शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

*शाळास्तरावर विद्यार्थ्यांची निवड*

प्रत्येक शाळेने तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी इयत्ता ५ वी ते ७ वीमधील कमाल १० विद्यार्थ्यांची, तसेच निबंध स्पर्धेसाठी इयत्ता ८ वी ते १० वीमधील कमाल १० विद्यार्थ्यांची नावे २५ सप्टेंबर पर्यंत सहायक कामगार आयुक्त कार्यालयास कळवावीत. संग्रहित

विद्यार्थ्याचे पूर्ण नाव, इयत्ता, शाळेचे नाव, मुख्याध्यापक किंवा शिक्षकांचा मोबाईल क्रमांक, पालकांचा मोबाईल क्रमांक आणि उपलब्ध असल्यास विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक ही माहितीही पाठविणे आवश्यक आहे. ही माहिती ८०८०४७२१९०, ९७६७६०१३१८, ८९७५९७६९४९ या क्रमांकांवर किंवा aclnanded@gmail.com या ई-मेलवर पाठवावी. सहभागी विद्यार्थ्यांना कार्यालयामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**बालकामगार निर्मूलन विषयावर स्पर्धा**

चित्रकला स्पर्धेसाठी ‘बालकामगार मुक्त भारत’, ‘मला शाळेत जायचे आहे, कामावर नाही’, ‘बालपण वाचवा’, ‘बालकामगार मुक्त समाज’, ‘शिक्षणाचा अधिकार, बालमजुरीला नकार’, ‘माझे बालपण, माझे स्वप्न’ आदी विषयांवर चित्र साकारता येईल.

निबंध स्पर्धेसाठी ‘बालकामगार निर्मूलनाची गरज’, ‘बालकामगार : कारणे, परिणाम आणि उपाययोजना’, ‘बालकामगार मुक्त भारतासाठी विद्यार्थ्यांची भूमिका’, ‘बालहक्क आणि बालकामगार निर्मूलन’, ‘मुलांच्या हातात पुस्तक हवे, कामाचे साधन नाही’ आदी विषय देण्यात आले आहेत.

**तालुकास्तरावरून ९६ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड**

शाळांकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येईल. स्पर्धेची तारीख व वेळ संबंधितांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. तालुक्यातील सोयीच्या शाळेत ही स्पर्धा घेण्यात येणार असून, तेथे विभागाचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहील. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी शाळेचे ओळखपत्र किंवा ओळखपत्र उपलब्ध नसल्यास संबंधित विद्यार्थी त्या शाळेत शिकत असल्याचे मुख्याध्यापक अथवा शिक्षकांचे प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. चित्रकला व निबंधासाठी आवश्यक साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणावे.

तालुकास्तरीय स्पर्धेनंतर प्रत्येक तालुक्यातून चित्रकला व निबंध स्पर्धेतील प्रत्येकी ३ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय अंतिम स्पर्धेसाठी निवड केली जाईल. अशा प्रकारे चित्रकलेचे ४८ आणि निबंधाचे ४८, असे एकूण ९६ विद्यार्थ्यांची निवड होईल. या ९६ विद्यार्थ्यांना कार्यालयामार्फत आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

**जिल्हास्तरीय अंतिम स्पर्धेतील सहा विजेत्यांचा होणार गौरव**

जिल्हास्तरीय अंतिम स्पर्धेत चित्रकला व निबंध या दोन्ही प्रकारांतून प्रत्येकी तीन विजेत्यांची निवड करण्यात येईल. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या एकूण ६ विजेत्यांना आकर्षक बक्षीस, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

#### गुणांकन पद्धत

**चित्रकला स्पर्धेसाठी विषयाची मांडणी ३०, कल्पकता २५, सामाजिक संदेश २०, चित्रातील सुसंगतता १५ आणि कलात्मकता व सादरीकरण १०, असे एकूण १०० गुणांचे मूल्यांकन करण्यात येईल.**

**निबंध स्पर्धेसाठी विषयाचे आकलन २५, आशय व मुद्देसूद मांडणी २५, बालकामगार विषयावरील ज्ञान २०, उपाययोजना व स्वतःचे विचार १५, भाषा व व्याकरण १० आणि सादरीकरण ५, असे एकूण १०० गुणांचे मूल्यांकन राहील.**

**शाळांचा सहभाग केवळ स्पर्धेपुरता मर्यादित न राहता बालकामगार निर्मूलनाच्या चळवळीतील सक्रिय सहभाग म्हणून पाहण्यात यावा. मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बालकामगाराच्या समस्येबाबत मार्गदर्शन करावे. तसेच परिसरात बालकामगार आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता संबंधित शासकीय यंत्रणेला माहिती देण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

**‘मुलांच्या हातात पुस्तक हवे, कामाचे साधन नाही’ हा संदेश विद्यार्थ्यांच्या चित्रातून, लेखणीतून आणि विचारातून समाजापर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमाचा व्यापक उद्देश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेकडे केवळ बक्षीस मिळविण्याची संधी म्हणून न पाहता बालकामगार निर्मूलनासाठी आपला आवाज व्यक्त करण्याची संधी म्हणून सहभागी व्हावे, असे सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी सांगितले.**

---

## हदगाव तालुक्यातील कोळी ग्रामपंचायतीत ग्रामसेवकांच्या हिशोबावरून ग्रामस्थांचा संताप

### हिशोब दिल्याशिवाय बदली न करण्याची गट विकास अधिकाऱ्याला दिलेल्या निवेदनातून ग्रामस्थांची मागणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**हदगाव :** ग्रामविकास अधिकारी किंवा ग्रामसेवकांच्या बदलीनंतर किंवा बदलीपूर्वी मागील काळातील आर्थिक व्यवहारांचा व विकास कामांचा हिशोब पूर्ण करूनच बदली अमलात आणण्यात यावी, अशी आक्रमक मागणी कोळी येथील ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

कोळी ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यरत असताना संबंधित ग्रामसेवकांनी विविध शासकीय योजना, ग्रामनिधी, कर वसुली आणि विकास कामांच्या माध्यमातून लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केले आहेत. नियमानुसार आणि पारदर्शक कारभाराच्या हितार्थ, कोणत्याही ग्रामसेवकाची बदली होण्यापूर्वी त्यांनी मागील काळातील सर्व जमा-खर्चाचा हिशोब, ऑडिट नोंदी, शिल्लक निधी आणि चालू असलेल्या विकास कामांचा ताळेबंद ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामसभेसमोर सादर करावा. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या**

संबंधित ग्रामसेवकाने मागील संपूर्ण काळातील जमा-खर्च, कर वसुली आणि विकास कामांचा अंतिम ताळेबंद व हिशोब पूर्ण करून सादर करावा.

जोपर्यंत हिशोब पूर्ण करून दिला जात नाही, तोपर्यंत त्यांची बदली करू नये अथवा त्यांची बदली प्रक्रिया हिशोब मिळेपर्यंत तात्पुरती स्थगित ठेवावी. हिशोब दिल्याशिवाय पदमुक्त करू नये, जेणेकरून ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राहील. ह्या अशा प्रकारच्या मागण्या निवेदना द्वारे गट विकास अधिकारी हदगाव यांना कोळी गावातील ग्रामस्थ द्वारे करण्यात आल्या आहे.

---

## ४००० किमी दूर ओडिशात सापडले ओरांगउटान जातीचे ५ वानर; एकाची किंमत आहे २५ लाख, वनविभागाचा तपास सुरू

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**ओडिशा :** ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यातील जंगलात पाच ओरांगउटान जातीची वानरे आढळून आल्यामुळे खळबळ उडाली आहे. यामुळे स्थानिक लोक आणि वन विभागाचे अधिकारी आश्चर्यचकित झाले आहेत. ओरांगउटान प्रजात इंडोनेशिया आणि मलेशियामध्ये आढळून येते. भारताच्या जंगलांमध्ये त्याचा वावर पाहायला मिळालेला नाही. त्यामुळे तब्बल ४००० किमी अंतरावरून ते ओडिशात कसे दाखल झाले? याचा शोध आता घेतला जात आहे. तसेच ओडिशा सरकारने केंद्र सरकारशी संपर्क साधून या पाच ओरांगउटानच्या पिलांना राज्यातच ठेवण्यासंबंधीची परवानगी मागितली आहे. या पिलांची उंची एक ते दीड फुट असल्याचे सांगितले जाते.

---

## सुखदेव देठे यांचे निधन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**पुणे :** अकोली खुर्द, ता. सोनबर्डी, जि. यवतमाळ येथील मूळ रहिवासी तथा सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले सुखदेव देठे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ‘आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ’चे राज्य युवा समन्वयक प्रशांत सुखदेव देठे यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने देठे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच चळवळीतील सहकाऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे.



दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कात्रज स्मशानभूमी, पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ‘आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ’च्या वतीने दिवंगत सुखदेव देठे यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी त्यांचे पुत्र प्रशांत सुखदेव देठे, अमोल सुखदेव देठे, अजय सुखदेव देठे तसेच ‘आम्ही भारताचे लोक’ चळवळीचे प्रशांत कदम, अमोल रणपिसे, अमोल राजमाने, अँड. नितीन घोडके, विजय कांबळे यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार व चळवळीतील सहकारी उपस्थित होते.

सुखदेव देठे यांच्या निधनाने देठे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे. उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण आदरांजली वाहून देठे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

---

## संघर्षातून उभे राहिलेले कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड

### प्रकाश बालाघाटे (घोगरे) अनंतात विलीन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**लोहा :** लोहा येथील प्रकाश संभाजीराव बालाघाटे (घोगरे) वय ७३ यांचे अल्पशा आजाराने दिनांक ८ रोजी मध्यरात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दिनांक ९ रोजी दुपारी ३ वाजता लोहा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अत्यंत संघर्षमय आणि प्रतिकूल परिस्थितीतून जीवनाचा प्रवास करताना प्रकाश बालाघाटे यांनी आपल्या कुटुंबाला सदैव शिक्षण, संस्कार आणि कष्टांची दिशा दिली. आपल्या चारही मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांनी त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. चारही मुलांनी शिक्षण पूर्ण करून चांगल्या नोकरीच्या माध्यमातून आपापल्या क्षेत्रात यश संपादन केले.

साधेपणा, कष्टाळूपणा, कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी आणि मुलांच्या शिक्षणासाठी केलेला त्याग प्रकाश बालाघाटे (घोगरे) यांचे व्यक्तिमत्त्व



सदैव स्मरणात राहील असे अनेक मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रीय भटक्या विमुक्त जाती जमाती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.संजय बालाघाटे,शिक्षक देविदास बालाघाटे, शिक्षक बालाजी बालाघाटे व शिक्षक पुरुषोत्तम बालाघाटे यांचे ते वडील होते. कै. प्रकाश बालाघाटे यांच्या पश्चात पत्नी, चार मुले,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

---

## प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत वारसाला दोन लाखाची मदत

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**कुंडलवाडी :** भारतीय रिझर्व बँक, बँक ऑफ महाराष्ट्र द्वारे व क्रिसिल फाउंडेशन यांच्या सहकार्याने मनीवाईज वित्तीय साक्षरता केंद्र, बिलोली येथे 01 सप्टेंबर 2021 रोजी Jio ऑफिस जवळ साठे नगर बिलोली येथे सुरू करण्यात आले. या केंद्राच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता शिबिराद्वारे ग्रामीण भागामध्ये बँकिंग सेवा पोहोचवण्याचे कार्य हे बिलोली, धर्माबाद व देगलूर या तीन तालुक्यांमध्ये चालू आहे.




बिलोली तालुक्यातील सगरोळी या गावातील विजय संतोष सोमवारे यांचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेमुळे सोमवारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला .या घटनेची माहिती मिळताच मनीवाईज वित्तीय साक्षरता केंद्र बिलोली येथील क्षेत्र समन्वयक श्रीमती संगीता वाघमारे आणि केंद्र व्यवस्थापक दर्शन वाघमारे यांनी कुटुंबाची चौकशी केली असता कै. विजय संतोष सोमवारे यांचा विमा हा (PMSBY ) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सगरोळी येथे काढण्यात आला होता असे आढळून आले. त्यानंतर केंद्र व्यवस्थापक दर्शन वाघमारे आणि क्षेत्र समन्वयक (FC) श्रीमती संगीता वाघमारे यांनी सगरोळी शाखेचे शाखा व्यवस्थापक विनोद कुमार यांना झालेल्या घटनेची माहिती दिली व कै. विजय सोमवारे यांचे वडील संतोष सोमवारे यांना सोबत घेऊन त्यांचा क्लेम दाखल केला. त्यानंतर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत बँकेला सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्या नंतर काही दिवसानंतर संतोष सोमवारे यांच्या खात्यात रोख रक्कम दोन लाख रुपये जमा झाले.

**मनीवाईज वित्तीय साक्षरता केंद्र बिलोली चे विभागीय व्यवस्थापक प्रभाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व्यवस्थापक दर्शन वाघमारे व क्षेत्र समन्वयक (FC) श्रीमती संगीता वाघमारे यांनी सोबत घेऊन बँकेला सर्व कागदपत्रांची पूर्तता करून वारसदार संतोष सोमवारे यांना (PMSBY ) या योजने अंतर्गत विम्याचा लाभ मिळवून दिला. या मदतीबद्दल सोमवारे कुटुंबीयांनी क्रिसिल फाउंडेशन मनीवाईज वित्तीय साक्षरता सेंटर बिलोली तसेच बँक ऑफ महाराष्ट्र सगरोळी चे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.**

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व **संपादक डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **गजानन केशवराव काळे** यांच्या **तेजस्विनी ऑफसेट प्रिंटर्स प्लॉट नं. डी-४१, साई स्मरण ऑइल इंडस्ट्रीज समोर, आर.टी.ओ. रोड, एमआयडीसी नांदेड - 431604** येथे प्रकाशित केले. E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya**, Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **GAJANAN KESHAVRAO KALE.** Printed at **TEJASWINI OFFSET PRINTERSPlot No. D-41, Opp. Sai Smaran Oil Industries R.T.O Road, MIDC Nanded, (Maharashtra) - 431604 M.S.** & Published Near AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715
Email: shramiklokrajya@gmail.com

# 40 दिवस पावसाची दडी; हिंगोली लोकसभा मतदारसंघ कोरड्या दुष्काळाच्या उंबरठ्यावर!

## शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या; खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**माहूर :** हिंगोली लोकसभा मतदारसंघातील हिंगोलीसह नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांतील अनेक भागांत तब्बल ३५ ते ४० दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने शेतीची अवस्था भयावह झाली आहे. उभ्या खरीप पिकांना पावसाची नितांत गरज असताना आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांसमोर आता पिके वाचविण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देऊन आवश्यक दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, अशी मागणी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



**निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या या शेतकऱ्याला आता आश्वासनांची नव्हे, तर शेतीसाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी वेळेत मिळणाऱ्या ठोस मदतीची गरज आहे. पिके हातातून निसटण्यापूर्वी आणि गावांमध्ये पाणीटंचाई तीव्र होण्यापूर्वी शासनाने जागे व्हावे; अन्यथा कृषी व पिण्याच्या पाण्याच्या जलसंकटाची ही चाहूल उद्याच्या आणखी मोठ्या दुष्काळाच्या संकटाची नांदी ठरू शकते.**

मराठवाड्यातील हिंगोलीसह नांदेड आणि विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यांतील भागांचा समावेश असलेल्या हिंगोली लोकसभा मतदारसंघात कोरड्या दुष्काळाची भीषण चाहूल लागली आहे. या मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ११ तालुक्यांचा समावेश होतो. उमरखेड- महागाव, किनवट-माहूर, हदगाव-हिमायतनगर, वसमत-औंढा नागनाथ, कळमनुरी तसेच हिंगोली-सेनगाव या भागांत पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांना ८ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात आष्टीकर यांनी म्हटले आहे की, खरीप पिकांच्या वाढीच्या अत्यंत महत्त्वाच्या काळात पावसाने खंड दिल्याने सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, ज्वारी आदी पिकांवर संकट ओढवले आहे. पेरणी, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करूनही अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे.

तातडीने पंचनामे करून मदत द्या

प्रभावित भागांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून दुष्काळसदृश परिस्थिती घोषित करावी, अशी मागणी आष्टीकर यांनी केली आहे. पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा, दुष्काळी सवलती तसेच शासनाच्या इतर योजनांचा लाभ तातडीने मिळवून द्यावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**पिके वाचविण्यासाठी वेळ कमी**

शक्य त्या भागात उभ्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपलब्ध पाण्याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही खासदार आष्टीकर यांनी केली आहे. पाऊस आणखी लांबल्यास हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता तातडीने निर्णय घेऊन आर्थिक मदत व आवश्यक दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, असे आष्टीकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निसर्गाच्या लहरीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाट्याला संकट मात्र कायमचेच ठरले आहे. गतवर्षी अतिवृष्टीने ओला दुष्काळसदृश परिस्थिती, तर यंदा जवळपास दीड महिन्याच्या पावसाच्या दडीने कोरड्या दुष्काळाचे संकट—वर्ष बदलले, संकटाचे स्वरूप बदलले; पण भरडला जातोय तो शेतकरीच! यवतमाळ, नांदेड आणि हिंगोलीसारख्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती केवळ शेतीचे संकट राहिले नसून कृषी आणि पिण्याच्या पाण्याच्या जलसंकटाचा गंभीर प्रश्न बनली आहे.

'तरबूज चाकूवर पडो किंवा चाकू तरबुजावर पडो, कापले जाणार तर तरबूजच!' ही म्हण आजच्या शेतकऱ्याची व्यथा अक्षरशः मांडते. आभाळ कोसळले तरी शेतकरीच भरडतो आणि आभाळ कोरडे राहिले तरीही तोच भरडतो.

---

# कुणबी प्रमाणपत्रासाठी मुखेड तालुक्यात १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरे

## महसूल मंडळनिहाय आयोजन; पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह सहभागी होण्याचे तहसीलदार अभयराज नंजुंडे यांचे आवाहन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** मराठा, कुणबी मराठा आणि मराठा कुणबी समाजातील पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सूचनेनुसार मुखेड तालुक्यातील सर्व महसूल मंडळांच्या स्तरावर १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेचा पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुखेडचे तहसीलदार अभयराज नंजुंडे यांनी केले आहे.




मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर पात्र नागरिकांच्या जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रक्रियेला गती देण्यासाठी हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. मुखेडचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासनामार्फत ही मोहीम राबविली जाणार आहे.

या शिबिरांत नागरिकांना जुन्या कुणबी नोंदी शोधण्यासाठी मदत करण्यात येणार असून, अर्जदारांनी सादर केलेले पुरावे व आवश्यक वैधानिक कागदपत्रांची जागेवरच तपासणी केली जाणार आहे. तसेच नवीन जात प्रमाणपत्रासाठीचे अर्जही शिबिराच्या ठिकाणी थेट स्वीकारले जाणार आहेत.

**महसूल मंडळनिहाय शिबिरांचे वेळापत्रक**

**१० सप्टेंबर : मुखेड व जांब बु. महसूल मंडळातील सर्व सज्जे व अंतर्गत गावे. ११ सप्टेंबर : येवती व अंबुलगा बु. महसूल मंडळातील सर्व सज्जे व अंतर्गत गावे. १५ सप्टेंबर : मुक्रमाबाद व बाहाळी महसूल मंडळातील सर्व सज्जे व अंतर्गत गावे. १६ सप्टेंबर : जाहूर व चांडोळा महसूल मंडळातील सर्व सज्जे व अंतर्गत गावे. ही विशेष शिबिरे संबंधित महसूल मंडळांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहेत. पात्र नागरिकांना लवकरात लवकर जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे.**

**आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन**

**मुखेड तालुक्यातील ज्या नागरिकांकडे जुने महसुली पुरावे, शैक्षणिक कागदपत्रे किंवा कुणबी नोंद उपलब्ध आहे, अशा पात्र नागरिकांनी संबंधित महसूल मंडळाच्या विशेष शिबिरास उपस्थित राहावे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा. त्यामुळे जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान होण्यास मदत होईल. प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन तहसीलदार अभयराज नंजुंडे यांनी केले आहे.**

---

# नरसी येथे भाजप महिला मोर्चाची संघटनात्मक बैठक उत्साहात

## महिला संघटन बळकट करून सक्षमीकरणाला चालना देण्याचा निर्धार

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा तथा माजी आमदार सौ. चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने नांदेड दक्षिण ग्रामीण महिला मोर्चाची संघटनात्मक बैठक नरसी येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत महिलांनी संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे वाढविण्यासह विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.





**या बैठकीस सौ. रूपाताई ठाकूर, सौ. महादेवीताई मठपती, सौ. वर्षाताई बंडाळे, सौ. मीराताई संगनोर, कु. श्रुती तुडमे, भावना दाशेटवार, सौ. अंजली दाचावार, पुष्पलता मुंडकर, उमाताई पवार, पल्लवीताई वडजे, विद्या अग्रवाल, जयश्री देवणे, कु. प्रिया जोशी यांच्यासह भाजप महिला मोर्चाच्या विविध पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला मोर्चाच्या या संघटनात्मक बैठकीमुळे नांदेड दक्षिण ग्रामीण भागातील महिला संघटनेला नवचैतन्य मिळाले असून, आगामी काळात गावागावांत संघटनात्मक विस्ताराला अधिक गती देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.**

सौ. प्रणिताई चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीचे आयोजन भाजप महिला मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्षा अनिताताई चोंडीकर यांच्या वतीने करण्यात आले होते. बैठकीत ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पक्षाची ध्येयधोरणे पोहोचविणे, विविध घटकांतील महिलांना संघटनेशी जोडणे तसेच महिला सक्षमीकरणासाठी प्रभावीपणे काम करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी महिलांना आत्मनिर्भर बनविणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचविणे, महिला नेतृत्व विकसित करणे आणि गावागावांत महिला संघटन मजबूत करणे यावर विशेष भर देण्यात आला. महिलांनी केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

बैठकीत आगामी काळातील संघटनात्मक उपक्रम, महिला मोर्चाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध कार्यक्रम तसेच बूथस्तरापासून महिला संघटना मजबूत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रत्येक गावातील महिलांशी संपर्क वाढवून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# कुंडलवाडी पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक संपन्न

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**कुंडलवाडी :** पोळा व गणेश उत्सव या दोन सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कुंडलवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने शांतता समितीची बैठक नुकतीच घेण्यात आली. या बैठकीत परिसरात शांतता, सलोखा आणि सामाजिक एकोपा कायम ठेवण्याबाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस कुंडलवाडी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार, उपनगराध्यक्षा सौ. नेहा ताई र्याकावार,धर्माबाद चे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, विद्युत मंडळाचे इंजिनिअर सुरेश गट्टूवार, उपनगराध्यक्षा प्रतिनिधी शैलेश र्याकावार,पोलीस स्टेशनचे सपोनि ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, गिरी साहेब व इतर पोलीस अधिकारी, शांतता समितीचे सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध मंडळांचे पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.




**यावेळी उपस्थित नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याची ग्वाही देत परिसरातील शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीच्या माध्यमातून पोलीस व नागरिकांमधील समन्वय अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले.**

सण-उत्सव काळात अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सर्वांनी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका व इतर सार्वजनिक उपक्रम शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. तसेच सोशल मीडियावरून अफवा अथवा आक्षेपार्ह संदेश प्रसारित करू नयेत, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले.